संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# गुंतवणूकदारांची महाराष्ट्राकडे पाठ

**लोकसभा** निवडणुकीच्या तोंडावर आचारसंहितेचा बडगा उगारण्यापूर्वी केंद्र आणि राज्य सरकारने वेगवेगळ्या योजनांच्या उद्घाटनाचा धडाका लावला आहे. मुंबईत एकाच दिवशी रेल्वेने तब्बल चार हजार कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पांची उद्घाटने केली. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी मानली जाते. परंतु ही सगळी उद्घाटने करताना त्याचा मुंबईला किंवा महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने किती लाभ होईल. हे सांगता येत नाही. कारण आतापर्यंत अनेक विकास कामांचा गाजावाजा झाला. परंतु त्यामधून जनतेचा थेट किती फायदा झाला हे स्पष्ट झालेले नाही. एकीकडे मुंबई आणि महाराष्ट्रासाठी वेगवेगळ्या योजनांच्या कोट्यवधी रुपयांची घोषणाबाजी चालू असताना दुसरीकडे प्रत्यक्षात गुंतवणूक क्षेत्रामध्ये महाराष्ट्राची पिछेहाट झाल्याची बातमी येऊन धडकली आहे. आतापर्यंत देशात पहिल्या क्रमांकावर असलेला महाराष्ट्र गुंतवणुकीमध्ये आता दुसऱ्या क्रमांकावर फेकला गेला आहे. आणि महाराष्ट्राची जागा दिल्ली, उत्तर प्रदेश आणि हरियाणा या राज्यांनी घेतल्याचे केंद्राच्याच उद्योग, प्रोत्साहन आणि अंतर्गत व्यापार विभागाने ही आकडेवारी सादर केली आहे. त्यामुळे त्याबद्दल विरोध होण्याचेही काही कारण नाही. गेल्यावर्षी महाराष्ट्रातली गुंतवणूक ८६,२४४ कोटी होती. आता ती ५६,४३६ कोटी इतकी खाली आली आहे. तर दिल्ली आणि उत्तर प्रदेश, हरियाणाच्या काही भागामध्ये झालेली परकीय गुंतवणूक ही ५७, ३३३ कोटींची असून महाराष्ट्रात मात्र ही ५६,४३६ कोटी असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. अगदी २०१६-१७ या वर्षात महाराष्ट्र हा परकीय गुंतवणुकीत सर्वोच्चस्थानी होत आणि आता त्याचीही घसरण सुरू झालेली आहे.कर्नाटकाने आपला तिसरा क्रमांक ठेवण्यात यश मिळवलेले दिसते. परंतु पंतप्रधानांची खरी कर्मभूमी असलेल्या गुजरातची जवळपास चौथ्या स्थानावर घसरण झाली आहे.या सगळ्या आकडेवारीवरून देशाची आर्थिक राजधानी ज्या महाराष्ट्राकडे आहे किंवा जो महाराष्ट्र गुंतवणुकीत सतत आघाडीवर असल्याचे सांगितले जाते. त्याची मात्र आता घसरगुंडी सुरू झाल्याचे दिसते. दिल्ली, उत्तरप्रदेश आणि महाराष्ट्र यांच्यातील फरक हा अगदी १००० कोटींचा जरी असला तरीसुध्दा महाराष्ट्राची ही घसरण होण्याचे कारण काय याचेही उत्तर मळाले पाहिजे.

### खरी कारणे काय

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्याच वर्षी महाराष्ट्र गुंतवणुकीमध्ये अव्वल स्थानावर असल्याचा दावा केला होता असे असताना केवळ वर्षभरामध्ये काय घडले की ज्यामुळे महाराष्ट्राची प्रामुख्याने परकीय गुंतवणुकीमध्ये एवढी घसरण व्हावी. याची दोन महत्त्वाची कारणे गृहित धरली जातात एक म्हणजे त्या त्या राज्यातील राजकीय परिस्थिती गुंतवणुकदारांना अनुकूल वाटत नसावी किंवा अशी गुंतवणुक मिळवण्यात त्या राज्याचे नेतृत्व कमी पडत असावे. परकीय गुंतवणुकदारांनी महाराष्ट्राकडे पाठ फिरवावी हा राज्यासाठी धक्का तर आहेच पण स्वाभाविकपणे राज्यकारभाराविषयीसुध्दा या परकीय गुंतवणूकदारांमध्ये तितका विश्वास राहिलेला नाही असेही म्हणावे लागते. अनेक प्रकारच्या पायाभूत सुविधा आणि इतर अनेक सवलती देऊनही हे गुंतवणूकदार महाराष्ट्रात येत नाहीत. यातून जाणारा संदेश नकारात्मक असल्याचे सिध्द होते. ज्याअर्थी परकीय गुंतवणूकदारांनी पाठ फिरवली त्याअर्थी स्थानिक उद्योग वाढीवरही त्याचा निश्चितच काही ना काही परिणाम झाला असला पाहिजे. सध्या रोजगार कमी झाल्याची जोरदार चर्चा देशभर सुरू आहे. महाराष्ट्रातली परिस्थिती त्यापेक्षा वेगळी नाही. प्रामुख्याने नोटबंदीनंतर या उद्योगव्यवसायांवर परिणाम झाले. शिवाय राज्याने उद्योगवाढीसाठी किंवा रोजगार निर्मिती हे उद्दिष्ट ठेवून कोणतेही विशेष प्रयत्न केलेले दिसत नाहीत. बेरोजगारीची ही परिस्थिती पाहूनच सरकारी नोकऱ्यांमधल्या जवळपास सत्तर हजार जागा भरण्याचा निर्णय घ्यावा लागला. आतापर्यंत उद्योग वाढीच्या किंवा गुंतवणुकीच्या नुसत्याच घोषणा होत राहिल्या असे म्हणावे लागते. प्रत्यक्षात त्याप्रमाणात उद्योगधंदे आणि कारखाने सुरू झालेले दिसत नाहीत. ज्या महाराष्ट्राला आतापर्यंत परकीय गुंतवणूकदारांनी प्राधान्य दिले होते. त्यांची बदलणारी ही भूमिका महाराष्ट्राच्या अर्थकारणाबरोबरच समाजकारण आणि राजकारणाविषयीसुध्दा प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरते. ही गुंतवणूक वाढावी यासाठी राजकीय इच्छाशक्ती कमी पडली स्वाभाविकपणे अपेक्षेप्रमाणे उद्योग किंवा व्यवसाय सुरू न झाल्याने त्याचा रोजगारवाढीवर परिणाम झाला. आणि समाजात तशा प्रतिक्रियाही व्यक्त झाल्या. जे बेरोजगारीचे चित्र उभ्या करणाऱ्या होत्या.

### गुंतवणूकमुक्त महाराष्ट्र

अर्थकारणाचा एवढ्यासाठीच विचार करणे क्रमप्राप्त होते की, सरकारने घेतलेले निर्णय किंवा राबवलेली धोरणे उद्योगपूरक आहेत की नाही, अशी शंका त्यातून निर्माण होते. मग अर्थसंकल्पातली तरतूद असेल तर कपात किंवा करवाढ यासारखे विषय असतील आणि सर्वात महत्वाचे म्हणजे उद्योग सुरु करणाऱ्यांसाठी ज्या परवानग्या लागतात त्या देण्यातला हलगर्जीपणा असेल ही सगळी कारणे राज्याच्या अर्थध्येयधोरणाशी जोडली जातात. पाच वर्षापूर्वी मोठा गाजावाजा करून मेक इन इंडियाची पहिली अगदी आंतरराष्ट्रीय दर्जाची परिषद मुंबईत भरवली गेली त्यावेळेला मुख्यमंत्र्यांनी मेक इन महाराष्ट्र अशी घोषणा केली होती. परंतु त्याचा पाठपुरावा झालेला दिसत नाही. इज ऑफ डुईंग बिझिनेस या घोषणेचाही प्रचंड मारा झाला होता. महाराष्ट्रात उद्योग सुरू करण्याकरिता पंधरा दिवसात सर्व प्रकारच्या परवानग्या एकाच खिडकीतून दिल्या जाऊ शकतात आणि तीन ते सहा महिन्यांमध्ये उद्योग उभा राहू शकतो, अशा प्रकारचा जलद कारभार महाराष्ट्रात असल्याचेही सांगितले गेले होते. पण मग आता या ताज्या आकडेवारीवरून इज ऑफ डुईंग बिझीनेससारखी कल्पनादेखील उपयोगी पडलेली दिसत नाही ज्याप्रमाणे जलयुक्त शिवार हे जलमुक्त शिवार झाले त्याच धर्तीवर गुंतवणुक मुक्त महाराष्ट्र अशी आज महाराष्ट्राची पिछेहाट दिसून येते. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचे कौतुक होत असताना गुंतवणुकीतली ही पिछेहाट म्हणजे त्यांच्या कारभाराला लागलेले गालबोट ठरते.